जा. ४१२०६
२२३१४

# महाराष्ट्र शासन

मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकण भवन,६वा मजला
नवी मुंबई:-४०० ६१४
दिनांक :-

**कार्यालयीन आदेश क्रमांक ६० दिनांक ४.२.२००४**

विषय:- नगरपालिका लेखापरीक्षणाचे निकष बदलणे बाबत.

संदर्भ:-१. कार्यालयीन आदेश क्र. १० दिनांक १/१०/१९९२.
२. कार्यालयीन आदेश क्र. ८ दिनांक २०/३/१९९७.

उपरोक्त संदर्भिय कार्यालयीन आदेश क्र. १० दिनांक १/१०/१९९२ अन्वये नगरपालिकाचे थकित लेखापरीक्षण नियमित आणणेसाठी लेखापरीक्षणासाठी विहीत केलेल्या निकषामध्ये तात्पुरता बदल करण्यात आलेला होता. त्यामध्ये नगरपरिषदांसाठी `**तीन महिन्याचे** व्यवहार तपासणेऐवजी **दोनच** महिन्याचे व्यवहारांची १००% तपासणी करावी. यामध्ये मार्च महिना सक्तीचा राहील` असे आदेश दिलेले होते. संदर्भ क्र. २ च्या कार्यालयीन आदेशान्वये सन १९९५-९६ पर्यंतच्या नगरपरिषदांचे थकित घटकांचे लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत उपरोक्त प्रमाणे दिलेले १/१०/१९९२ चे आदेशच लागू राहतील असे कळविण्यात आलेले होते.

मात्र अद्यापही ब-याच कार्यालयाकडून कार्यालयीन आदेश दिनांक १/१०/१९९२ मध्ये दिलेल्या सुचना कायमस्वरुपी समजून त्यानुसारच कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम १९३१ मधील नियम १४ नुसार सर्व नगरपालिकांच्या `**तीन महिन्यांच्या**` व्यवहारांची १००% तपासणी करावी. यामध्ये मार्च महिना सक्तीचा राहील. उर्वरित ९ महिन्यातील व्यवहारांचा सर्वसाधारण आढावा घेण्यात यावा.

आपल्या अधिनस्त नगरपालिकाचे लेखापरीक्षण उपरोक्त नियमातील तरतुदीनुसार होत आहे. याची सर्व उपमुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), व सर्व उपमुख्य लेखापरीक्षक यांनी खात्री करावी. याबाबत योग्य दक्षता घेण्यात यावी.

मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत:-
१. उपमुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, ---------------
२. उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, ---------------
३. कार्यालयीन नस्ती.